# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info

E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२६७८३३

फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


क्र.ससं/उशि/पुवि/१.१०/पदनिश्चिती/कार्यशाळा/२०२२/३९८७

दि.२०-१२-२०२२

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.०१ ऑक्टोबर, २०२१ व दि.०१ ऑक्टोबर, २०२२ च्या विद्यार्थी संख्येवर आधारीत शिक्षक आणि शिक्षकेतर पदांचा आढावा...

संदर्भ:- या कार्यालयाकडील समपत्र क्र.३२१५, दि.२८-१०-२०२२ व दि.२२-११-२०२२.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.०१ ऑक्टोबर, २०२१ व दि.०१ ऑक्टोबर, २०२२ च्या विद्यार्थी संख्येवर आधारावर अनुज्ञेय होणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर पदनिश्चितीच्या शिबीराचे दि.०१ ते ०४ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत आयोजन करण्यात आलेले होते.

सदरहू शिबीरामध्ये बहुतांशी महाविद्यालयांनी (१) तपासणी सूचीनुसार परिपूर्ण माहिती, (२) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याने विद्यार्थी संख्येची व कार्यभाराच्या परिगणनेची माहिती, (३) विद्यापीठाने प्रमाणित केलेली विद्यार्थी संख्या इ. परिपूर्ण माहिती सादर केली नसल्याने दि.२३ व २४ नाव्हेंबर, २०२२ या कालावधीत ऑनलाईन बैठक घेऊन पदाच्या आढाव्यासंदर्भात सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. सदर सूचनांच्या अनुषंगाने योग्य तो फेरबदल करुन सुधारितपणे दि.०१-१०-२०२२ च्या विद्यार्थी संख्येवर आधारीत पदांचा आढावा खालीलप्रमाणे आयोजित केलेल्या कृतीसत्रामध्ये सादर करण्यात यावा.

| अ.क्र. | जिल्हयानिहाय / अ.क्र.निहाय महाविद्यालये | दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | पुणे शहर (अ.क्र.१ ते २० महाविद्यालये) | दि.२१-१२-२०२२ रोजी स.१०.०० वा. | नौरोसजी वाडीया महाविद्यालय, पुणे |
| | पुणे ग्रामीण (अ.क्र.११ ते ३३ महाविद्यालये) | | |
| २ | अहमदगनर (अ.क्र.१ ते १० ची महाविद्यालये) | दि.२२-१२-२०२२ रोजी स.१०.०० वा. | |
| | पुणे शहर (अ.क्र.२१ ते ४९ महाविद्यालये) | | |
| ४ | पुणे ग्रामीण (अ.क्र.१ ते १० ची महाविद्यालये) | दि.२३-१२-२०२२ रोजी स.१०.०० वा. | |
| | नाशिक (अ.क्र.११ ते ४६ महाविद्यालये) | | |
| ३ | नाशिक (अ.क्र.१ ते १० ची महाविद्यालये) | दि.२४-१२-२०२२ रोजी स.१०.०० वा. | |
| | अहमदनगर (अ.क्र.११ ते ४० ची महाविद्यालये) | | |

सदरहू कृतीसत्रासाठी उपरोक्त प्रमाणे दिलेल्या वेळापत्रकानुसार माहितीगार कर्मचाऱ्यानेच उपस्थित राहून, ऑनलाईन बैठकीमध्ये दिलेल्या सूचनांनुसारची माहिती सादर करण्यात यावी. तसेच सदरहू दि.०१-१०-२०२१ व दि.०१-१०-२०२२ ची विहीत विवरणपत्रांची **MS-Excel** मधील **Soft Copy / सॉफ्टकॉपी** कृतीसत्रामध्ये सादर करावी.

**(डॉ.किरणकुमार बोंदर)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

Padacha Adhava 1.10.21 & 1.10.22 pune.doc